N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S. (पोलीस ठाणे):** शाहुपूरी **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0472 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/06/2026 10:47 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 22/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 22/06/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 17:30 तास **Time To (वेळेपर्यंत):** 21:04 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 25/06/2026 **Time (वेळ):** 10:33 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 019 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 25/06/2026 10:33 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 00 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** शाहुपूरी पोलीस ठाणे,कोल्हापुर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S. (पोलीस ठाणे):** शाहुपूरी **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0472 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/06/2026 10:47 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 22/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 22/06/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 17:30 तास **Time To (वेळेपर्यंत):** 21:04 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 25/06/2026 **Time (वेळ):** 10:33 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 019 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 25/06/2026 10:33 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 00 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** शाहुपूरी पोलीस ठाणे,कोल्हापुर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उज्वला मारूती भडकमकर
पोलीस निरीक्षक लाचलुचपत

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत , प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर, शाहुपूरी, कोल्हापुर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत , प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर, शाहुपूरी, कोल्हापुर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8446153029

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | अपर्णा सुखदेव जाधव पोलीस उपनिरीक्षक | | | 1. महालक्ष्मी मंदीर समोर,Town/Village (शहर / गाव): नाना अपार्टमेंट,Tehsil (तहसील): रूम नं 201,कळंबा,ताकरवीर,Police Station (पोलीस ठाणे): शाहुपूरी,District (जिल्हा): कोल्हापुर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमतेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दिनांक - 25/06/2026

मी उज्वला मारूती भडकमकर वय 38 -वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8446153029 समक्ष शाहुपूरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे हजर राहुन फिर्याद

देते की,

मी दिनांक 22/06/2026 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मला वैष्णवी पाटील, पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांनी बोलावुन घेवुन, समक्ष हजर असले तक्रारदार तुकाराम सर्जेराव खुटाळे वय 41 वर्षे ,व्यवसाय कॉन्ट्रॅक्टर रा.खुटाळवाडी ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर सध्या रा.नागाळा पार्क,कोल्हापूर मो नं. 8805000028 यांची ओळख करून देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगितले. त्यांच्या तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करून घेणेस व पुढील कारवाई करणेबाबतचा मुखशील आदेश आम्हास दिला. त्यावेळी आम्ही तक्रारदार खुटाळे यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी तक्रारीची हकिकत सांगितली की, की,दि.02/06/2026 रोजी पत्नी सौ.पल्लवी हिचे सोबत माझे घरगुती कारणावरून भांडण झाले होते.त्यावेळी पत्नी सौ.पल्लवी हिने शाहुपूरी पोलीस ठाणे येथे माझे विरूध्द दिले तक्रारीवरून माझेवर शाहुपुरी पोलीस ठाणेस गु.र.नं.409/2026 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव यांचेकडे होता.त्यांनी मला सदर गुन्हयामध्ये अटक केलेली होती.मी अटकेमध्ये असताना पोलीस उपनिरीक्षक जाधव मॅडम यांनी मला गुन्हयात व जामीनासाठी मदत करते असे म्हणून माझेकडे 40,000 रू.ची मागणी केली होती.त्यावेळी मी अटकेत असल्यामुळे मी माझे वडीलांना सांगून पोलीस उपनिरीक्षक जाधव मॅडम यांना 25000 रू.दिले होते.त्यानंतर दि. 20/06/2026 रोजी मी जामीनावर खुला झालो आहे. पत्नी राहणेस असलेल्या ठिकाणी मला न जाणेबाबतची अट न्यायालयाने दिलेली आहे. पोलीस उपनिरीक्षक जाधव मॅडम यांची मदत घेवून घरी जावून माझे एटीएम कार्ड व इतर कागदपत्र घेवून यायचे असल्याने, मी आज रोजी त्यांना भेटण्यास जाणार आहे. त्यावेळी पोलीस उपनिरीक्षक जाधव मॅडम हया माझेकडे राहीलेले आणखी 15,000 रू. ची लाच मागणी करणार असल्याची माझी खात्री आहे. तरी आपलेकडून कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. तसेच मी दिनांक 22/06/2026 रोजी पोलीस उपनिरीक्षक जाधव मॅडम यांची शाहूपुरी पोलीस ठाणे येथे त्यांची भेट घेणेस जाणार असलेचे सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा.नगर भूमापन अधिकारी कार्यालय,कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच बोलावुन घेतले. शासकीय पंच आलेनंतर आम्ही कार्यालयातील सापळा पथकातील अमंलदार यांना बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार खुटाळे यांची पंचाशी व सापळा पथकातील अमंलदार यांचेषी ओळख करुन दिली. माझे सुचनेवरून खुटाळे यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. खुटाळे यांनी तोंडी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. त्यावेळी मी पुढील कारवाई अँन्टी करप्शन ब्युरोचे ऑफीसमधुन करण्याचे आहे असे सांगुन, तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार खुटाळे व पंच नं.01 सुर्यकांत शिरढोणे यांचेसह सर्वप्रथम शाहुपरी पोलीस ठाणे येथील पोलीस उप निरीक्षक जाधव मॅडम हया तक्रारदार यांचेकडे लाच मागणी करतात, अगर कसे याची पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हॉईस रेकार्डर काढून त्यामध्ये MASTER कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकार्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हॉईस रेकार्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणीचे अनुषंगाने तक्रारदार खुटाळे व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यांनतर

पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकाॅर्डर 17.30 वाजता चालु करून, तो खुटाळे यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार खुटाळे व पंच नं.1 सुर्यकांत शिरढोणे यांना तक्रारदार यांचे महिंद्रा बोलेरो गाडी नं.एम.एच 09- डी. एक्स - 0028 वरून शाहुपूरी पोलीस ठाणे येथे जाधव मॅडम यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी आम्ही,सापळा पथक व पंच नं.02 विवेक जाधव असे आॅफीसमध्ये थांबुन राहीलो. खुटाळे व पंच नं.1 सुर्यकांत शिरढोणे असे काहीवेळाने अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात परत आले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 19.07 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 सुर्यकांत शिरढोणे यांना तुम्ही तक्रारदार यांचेसोबत शाहुपूरी पोलीस ठाणे येथे जाधव मॅडम यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता, पंच शिरढोणे यांनी ते तक्रारदार यांचेसोबत शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गेलो. त्यावेळी तेथे जाधव मॅडम उपस्थित नव्हत्या म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचे मो.नं.8805000028 वरून जाधव मॅडम यांचे मो.नं. 8551876161 वरती फोन करून ते शाहुपूरी पोलीस ठाणे येथे आल्याचे सांगितले. त्यावेळी जाधव मॅडम यांनी त्या थोडयावेळात पोलीस ठाणेस येत असल्याचे सांगितले. काहीवेळाने जाधव मॅडम पोलीस ठाणेमध्ये आल्या व त्या ज्या ठिकाणी बसतात तेथे गेल्या त्यांचे पाठोपाठ तक्रारदार व मी गेलो. त्यावेळी जाधव मॅडम "नमस्कार खुटाळे साहेब, अहो कधी सुटला.." असे म्हणाल्या त्यावेळी तक्रारदार खुटाळे वीस तारखेला.. असे म्हणाले. त्यानंतर जाधव मॅडम व तक्रारदार खुटाळे यांच्यात त्यांचे पत्नीने त्यांचेवर दाखल केले गुन्हयाचे व जामीनावर सुटलेचे तसेच जामीनातील अटीच्या अनुषंगाने बोलणे झाले. तसेच जाधव मॅडम यांनी तक्रारदार यांना त्यांचे पत्नीस भेटु नका असे सांगितले. त्यावेळी जाधव मॅडम "हा त्या दिवशी फ्लॅटवर होती, शेजारच्या फ्लॅटवरील 301 मधील बोलवलं सगळ केलं, त्या दिवशी वडीलांनी फक्त ऐवढं दिलं असे म्हणुन एका कागदावर 25,000/- असे लिहुन तक्रारदार यांना दाखविले. त्यावेळी तक्रारदार "वडीलांनी.." असे म्हणाले. त्यावेळी जाधव मॅडम "कसेच देत नव्हते, पार वकीलांच्या हाता पाया पडून पडून मग दिले.." असे म्हणाल्या. त्यावेळी खुटाळे "25,000/- दिले, किती हजार झालं की,बास करा की आता... मला एक वीस माझं एक काम टर्मिनल झालं..."असे म्हणुन "तुमची अजून अपेक्षा आहे.." असे विचारले. त्यावेळी जाधव मॅडम "तुम्हाला नसलं तर आम्ही नाही फोर्स करू शकत..." असे म्हणाल्या. त्यावेळी खुटाळे यांनी त्यांचे कागदपत्रे पत्नीचे राहते ठिकाणी आडकल्याचे सांगितले. त्यावेळी जाधव मॅडम "आम्हाला सांगायची काय गरज नाही. तो तुमच्या वैयक्तीक प्रश्न आहे. "ते करायचं असलं तर लवकर .. करा नाही करायच तर नाही करा." अस काय आम्ही काय म्हणणार नाही. काल तुमच्या वकीलांनी लय जिकीरी आणली असे म्हणाल्या. त्यावेळी तक्रारदार खुटाळे यांनी "अजुन किती दयायचे.." असे विचारले त्यावेळी जाधव मॅडम यांनी एका कागदावर 25,000/- रूपये असे लिहुन "ऐवढंच राहिलं, आपलं ठरलं तेवढंच राहिलं.." असे म्हणाल्या. त्यावेळी तक्रारदार खुटाळे "पंचविस हजार" असे म्हणाले. त्यावेळी जाधव मॅडम "हं.." असे म्हणुन तेवढंच राहिलं, तुमचे वकील म्हटलं माझं मी आणून देतो. तुमचे वडील काय येणार नाहीत हे आम्हाला माहिती हाय, त्यांनी काय काय केलं वडीलानी पण तुमच्या करायला काय बोलायचं काम नाही. असे म्हणाल्या. त्यावेळी तक्रारदार खुटाळे त्यात काय तरी कमी करा, त्यात असे म्हणाले. त्यावेळी जाधव मॅडम "साहेब नको .. बास की , पार रडून रडून चाललयं विषय आपला, काय

तुम्ही वकीलांला सांगितलं तेवढं आणून दिलं तर चालेलं बास, नाही केलं तर नाही असा काय विषय नाही. फक्त शब्दासाठी“ असे म्हणाल्या. त्यावेळी खुटाळे ”वकील आणून देतात. आता त्याला नको घ्यायला.. “असे म्हणाले. त्यावेळी जाधव मॅडम वकीलाला डायरेक्ट टाकुन दया, वकीलाच्या अकाउटवर टाकून दया, नाही तर वकीला जवळ करा असे म्हणुन त्यांची पत्री पोलीसांना काय काय बोलते ते त्यांना सांगितले. त्यानंतर जाधव मॅडम व तक्रारदार खुटाळे यांच्यात हजेरीसाठी येण्याविषयी तसेच त्यांचे पत्रीविषयी तसेच गुन्हयाचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी पैसे थोडयावेळाने घेवुन येतो असे सांगितले. त्यानंतर आम्ही परत आल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही खुटाळे यांना विचारले असता त्यांनी पंच नं. 01 शिरढोणे यांनी सांगितलेप्रमाणेच हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेकाॅर्डरमधील तक्रारदार खुटाळे व शाहुपूरी पोलीस ठाणे येथील पोलीस उप निरीक्षक जाधव मॅडम यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार खुटाळे यांचेसमक्ष ऐकले. यावरून तक्रारदार खुटाळे व पोलीस उप निरीक्षक जाधव मॅडम यांची भेट होवुन त्यांच्यामध्ये तक्रारदार यांचेवर दाखल असले गुन्हयात मदत करतो तसेच जामीनासाठी मदत केली म्हणुन तक्रारदार यांचे वडीलांचेकडुन तक्रारीपुर्वी 25,000/- रूपये स्विकारल्याचे मान्य करून तक्रारदार यांच्याकडे आणखीन 25,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही पोलीस उप निरीक्षक जाधव मॅडम, शाहुपूरी पोलीस ठाणे यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सुचना दिल्या. त्यानंतर मी खुटाळे यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 50 चलनी नोटा असे 25,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार खुटाळे व पंचाना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व, संपुर्ण कार्यवाही, तसेच त्याअनुषंगाने तक्रारदार व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर अँथ्रासिन लावलेले 25,000/- रूपये तक्रारदार यांचे शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार खुटाळे, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार खुटाळे यांना जाधव मॅडम यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचा डावा हात चेह-यावरुन फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकाॅर्डर 20.35 वाजता सुरू करून, तो तक्रारदार खुटाळे यांचे शर्टचे आतमध्ये गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार खुटाळे व पंच नं.1 शिरढोणे असे त्यांचे महिंद्रा बोलेरो गाडी नं.एम.एच 09-डी. एक्स - 0028 वरून शाहुपूरी पोलीस ठाणे येथे पोलीस उप निरीक्षक जाधव मॅडम यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 विवेक जाधव असे आपआपले दुचाकी वाहनावरून तक्रारदार यांचे पाठोपाठ शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गेलो. खुटाळे व पंच नं.01 शिरढोणे हे शाहुपुरी पोलीस ठाणेच्या गेट मधून आत जावून ठाणे अंमलदार कक्षाचे उजव्या बाजूस असले अधिकारी कक्षाकडे गेले. पोलीस ठाणेत रात्रीची हजेरीची वेळ असल्याने पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची गर्दी होती. त्यावेळी आम्ही सापळा पथकातील पोना/सचिन पाटील यांना तक्रारदार यांच्या नियोजित इशारा स्पष्ट कळावा म्हणुन पोलीस ठाणेच्या आतमध्ये जाणेस सांगुन आम्ही सर्वजण पोलीस ठाणेच्या आजुबाजुस कोणालाही शंका न येता सापळा लावुन तक्रारदार यांच्या

इशा-याकडे लक्ष देवुन थांबुन राहीलो. तक्रारदार खुटाळे हे एका महिला अधिकारी यांचेशी बोलत असल्याचे आम्ही पाहीले यावरून सदर अधिकारी जाधव मॅडम आहेत असे आमचे लक्षात आले. काहीवेळाने तक्रारदार खुटाळे यांनी त्यांचा डावा हात चेह-यावरुन फिरवला, त्यावेळी आम्हास तक्रारदार यांनी पुर्वनियोजित इशारा केल्याने आम्ही, पंच नं.02 पोना/सचिन पाटील व मपोहेका ॅ/संगिता गावडे असे तक्रारदार यांच्या जवळ गेलो. त्यावेळी आम्ही पोना/सचिन पाटील यांच्याकरवी तक्रारदार खुटाळे यांच्याकडील डिजिटल व्हाईस रेकाॅर्डर काढून तो 21.04 वा. बंद करुन ताब्यात घेतला.

त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना बाजूला थांबणेस सांगुन पंच नं. 1 शिरढोणे यांना लाच रक्कम कोणी स्विकारली अशी विचारणा केली, त्यावेळी तक्रारदार यांना जाधव मॅडम यांनी "आपण अॅडजस्ट होतय का बघुया, तिथ तिथ ठेवुन दया, तिथ ठेवून दया कोप-यात, ठेवून दया काय अडचण नाही. ठेवून दया." असे म्हणून लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला, परंतू तक्रारदार यांनी पोउपनि जाधव मॅडम यांनी सांगितले ठिकाणी ठेवली नाही, त्या दरम्यान तक्रारदार यांनी लाच रक्कम न देता, त्यांनी चुकुन त्यांचा डावा हात चेह-यावरुन फिरवुन लाच स्विकारलेचा पुर्वनियोजित इशारा केला आहे असे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार खुटाळे यांना आपण लाच रक्कम पोउपनि जाधव मॅडम यांनी मागणी करून ठेवणेस सांगितली असताना, लाच रक्कम सांगितले ठिकाणी न ठेवता, लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा का केला, अशी विचारणा केली. त्यावेळी त्यांना पोउपनि जाधव मॅडम यांनी त्यांना लाच रक्कम कोप-यात ठेवण्यास सांगितली परंतु लाच रक्कम त्यांना जाधव मॅडम यांचे हातात दयायची असल्याने त्यांनी सांगितले ठिकाणी लाच रक्कम ठेवली नाही. तसेच त्यांच्या सोबत बोलत असताना गर्मीमुळे चेह-वर घाम आल्यामुळे त्यांनी चुकुन त्यांचा डाव हात चेह-रावरुन फिरवला असल्याचे सांगून, तो लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा असल्याने आपण तेथे आला अशी हकीकत सांगितली. तक्रारदार यांनी लाच रक्कम दिली नसल्याने आम्ही, पंच, तक्रारदार व सापळा पथक असे शाहुपुरी पोलीस ठाणे येथून परत अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात आलो.

त्यानंतर तक्रारदार खुटाळे यांनी दिनांक 23/06/2026 रोजी पडताळणी व सापळा कारवाईमध्ये घडले हकीकती सांगनु सापळा कारवाई वेळी पोलीस उपनिरीक्षक जाधव मॅडम ह्या सावध झाल्या त्यामुळे त्यांनी पैसे स्विकारले नाहीत. तसेच त्या आता खुटाळे यांच्याकडुन पैसे स्विकारणार नाहीत अशी त्यांची खात्री झाली आहे. तरी त्यांचेवर कायदेशिर कारवाई करावी असा जबाब दिला आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार तुकाराम खुटाळे यांचेवर शाहूपूरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.409/2026 प्रमाणे दाखल असले गुन्हयात मदत करतो तसेच जामीनासाठी मदत केली म्हणुन तक्रारदार खुटाळे यांचे वडीलांचेकडुन तक्रारीपुर्वी 25,000/- रूपये लाच रक्कम स्विकारल्याचे मान्य करून तक्रारदार खुटाळे यांच्याकडे स्वताःकरीता बेकायदेशीरपणे आणखीन 25,000/- रूपये लाचेची मागणी करून बेकायदेशीर लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक अपर्णा सुखदेव जाधव, पद- पोलीस उपनिरीक्षक, शाहुपुरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर मुळ रा. हातनोळी, ता. तासगाव, जि.सांगली सध्या रा.महालक्ष्मी मंदीर समोर, नाना अपार्टमेंट रूम नं. 201, कळंबा, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 चे कलम 7

प्रमाणे माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष

हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** santosh gundopant doke **(पोलीस निरीक्षक) or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**
**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

ठाणे अमलदार
शाहूपुरी पोलीस ठाणे

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** santosh gundopant doke